दैनिक

# चकमक

संपादक : शामसुंदर चितोडा

कार्यकारी संपादक : कैलास फुलारी




❊ वर्ष : ०१ ले ❊ ❊ अंक : ८१ ❊ ❊ गुरूवार २२ ऑक्टोबर २०२६ ❊ ❊ जालना ❊ ❊किंमत : २ रूपये ❊ ❊पृष्ठे : ४ ❊

◎Volume 01◎ ◎ Issue 81 ◎ ◎ Thursday, Date : 22 October 2026 ◎ ◎ Jalna ◎ ◎Price Rs. 2 ◎ ◎Pages 4 ◎

### उद्या पदवीधर मतदारसंघाची निवडणुक

## प्रशासन झाले सज्ज;आयुक्त जी श्रीकांत यांनी घेतला आठही जिल्हांचा आढावा



छत्रपती संभाजी नगर/ प्रतिनिधी : औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी प्रशासन सज्ञ झाले असून, मतदान प्रक्रिया सुरळीत, निर्भय व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी जी. श्रीकांत यांनी दिले. शुक्रवार दि. २३ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी आज बुधवारी दुपारी ऑनलाइन पद्धतीने विभागातील आठही जिल्ह्यांचा आढावा घेतला.या बैठकीत छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, परभणी, नांदेड आणि हिंगोली या जिल्ह्यांतील निवडणूक तयारीचा आढावा घेण्यात आला.

मतदान केंद्रांवरील मूलभूत सुविधा, मतदारांसाठी आवश्यक व्यवस्था, मतदान साहित्याची उपलब्धता, अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती तसेच मतदान केंद्रांवरील सुरक्षा व्यवस्थेची माहिती यावेळी घेण्यात आली. मतदान केंद्रांच्या परिसरात राजकीय पक्षांच्या बूथ व्यवस्थेसाठी करण्यात आलेल्या नियोजनाचाही आढावा घेण्यात आला. मतदारांना कोणतीही अडचण न येता मतदानाचा हक्क बजावता **(पान ३ वर)**

## अधर्मावर धर्माचा आणि असत्यावर सत्याचा विजय: परतुरात उत्साहात पार पडला भव्य रावण दहन सोहळा





परतूर । प्रतिनिधी : परतूर येथील श्री साईनाथ मंदिर परिसरात २० ऑक्टोबर रोजी विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर दसरा उत्सव समितीच्या वतीने पारंपारिक आणि भव्य 'रावण दहन' सोहळा अत्यंत उत्साहात, जल्लोषात व मोठ्या जनसागराच्या उपस्थितीत पार पडला. वाईट विचारांवर चांगल्या विचारांचा विजय आणि असत्यावर सत्याचा विजय हा संदेश देणाऱ्या या ऐतिहासिक सोहळ्यास हजारो नागरिकांनी व लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वच वयोगटातील नागरिकांनी हजेरी लावली होती. या अभूतपूर्व गर्दीमुळे परिसराला अक्षरशः यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. आ. बबनराव लोणीकर यांचे मार्गदर्शन व विचार कार्हा कार्यक्रमाचे मुख्य अतिथी तथा माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, रावण हा ऋद्धी-सिद्धी प्राप्त बलाढ्य राक्षस होता, ज्याचा पृथ्वीतलावर पराभव कुणीही करू शकत नव्हता. मात्र, रावण हा अहंककारी व दुष्टवृत्तीचा असल्यामुळे त्याचा अंत झाला. त्याच्या मृत्यूचे रहस्य त्याचा भाऊ बिभीषणने उघड केले. त्यामुळे अहंकार आणि वाईट वृत्तीचा नाश अटळ आहे.

त्यांनी पुढे स्पष्ट केले की, आजच्या काळात रावण दहन म्हणजे केवळ पुतळा जाळणे नव्हे, तर आपल्या मनातील राग, द्वेष, अहंकार, भ्रष्टाचार आणि जातीयता यांसारख्या वाईट विचारांचे दहन करणे होय. जेव्हा आपण आपल्यातील नकारात्मकता संपवून चांगल्या विचारांची कास धरू, तेव्हाच खऱ्या अर्थाने रामराज्याची निर्मिती होईल. याशिवाय, सध्याच्या दुष्काळ परिस्थितीमुळे शेतकरी व नागरिक चिंतेत असून, **(पान ३ वर)**

### नायब तहसीलदार राणी जाधव यांचा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेतर्फे सत्कार



**नवनाथ गव्हाणे/बदनापूर** : जालना येथे पुरवठा निरीक्षक पदाची जबाबदारी सांभाळणाऱ्या तथा नव्याने नायब तहसीलदारपदी नियुक्त झालेल्या राणी जाधव मॅडम यांचा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद, बदनापूर तालुक्याच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी राणी जाधव मॅडम यांचा सन्मान करून त्यांना पुढील प्रशासकीय वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. सामाजिक समता, महात्मा फुले यांचे विचार आणि समाजहिताच्या कार्याला प्रोत्साहन देण्याच्या भावनेतून हा सत्कार सोहळा पार पडला. या प्रसंगी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे बदनापूर तालुकाध्यक्ष विलास खैरे यांच्यासह परिषदेचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. नवनियुक्त पदाच्या माध्यमातून राणी जाधव मॅडम यांच्या हातून जनतेची उत्तम सेवा घडावी, अशा सदिच्छा यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

## भोकरदन शहरात वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून 'उत्सव मार्केट' सुरु करा ; नगरसेवक राजाराम सहाणे यांची मागणी



भोकरदन : भोकरदन शहरातील मेन मार्केट, हेडगेवार चौक ते सिल्लोड कॉर्नर परिसरात सणासुदीच्या काळात होणारी वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी रस्त्याच्या कडेला छोटे-मोठे स्टॉल व दुकाने लावण्यासाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून द्यावी व त्याला उत्सव मार्केटअसे नाव देऊन नियोजन पद्धतीने विकसित करावे अशी मागणी नगरसेवक राजाराम सहाणे यांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री गजानन तायडे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,भोकरदन शहरातील मेन मार्केट, हेडगेवार चौक ते सिल्लोड कॉर्नर हा परिसर प्रमुख व्यापारी केंद्र म्हणून ओळखला जातो. सणासुदीच्या काळात या भागात नागरिकांची मोठ्या प्रमाणावर खरेदीसाठी गर्दी होते. त्यामुळे रस्त्यांवर वाहतूक कोंडी निर्माण होते. रस्त्याच्या कडेला छोटे-मोठे स्टॉल, दुकाने तसेच हातगाड्या लावण्यात येत असल्याने वाहनचालकांना मार्ग काढताना अडचणींचा सामना करावा लागतो. परिणामी नागरिक, व्यापारी आणि वाहनचालकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागते.

या वाहतूक कोंडीमुळे व्यापाऱ्यांच्या व्यवसायावरही परिणाम होत असून रुग्णवाहिका, अग्निशमन वाहने तसेच इतर अत्यावश्यक सेवांच्या वाहनांना मार्ग काढताना अडथळे निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे सणासुदीच्या काळात शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी कायमस्वरूपी नियोजन करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तसेच सणासुदीच्या काळात लहान व्यावसायिकांना व्यवसायासाठी योग्य जागा मिळावी आणि मुख्य बाजारपेठेतील वाहतुकीवरील ताण कमी व्हावा यासाठी नगरपरिषदेने स्वतंत्र जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. या जागेवर नियोजनबद्ध पद्धतीने छोटे-मोठे स्टॉल उभारून त्यांना तात्पुरत्या स्वरूपात व्यवसायाची संधी देता येईल. त्यामुळे लहान **(पान ३ वर)**

### भोकरदन येथे 'कल्याणी दूध संकलन व शीतकरण केंद्रा'चा आ.संतोष दानवे यांचे हस्ते उद्घाटन



**भोकरदन/अमित लोहाडे** : भोकरदन येथे अंकुश भिकनराव जाधव यांच्या 'कल्याणी दूध संकलन व शीतकरण केंद्रा'चा उद्घाटन सोहळा आ. संतोष भाऊ दानवे यांच्या हस्ते अत्यंत उत्साहात संपन्न झाला. या वेळी आ. संतोष दानवे यांनी शेतीला पूरक असणारा दुग्ध व्यवसाय हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा खरा कणा आहे. आधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज असलेले हे शीतकरण केंद्र परिसरातील दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या कष्टाला योग्य मोल मिळवून देण्यासाठी आणि त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी मोलाची भूमिका बजावेल, असा ठाम विश्वास व्यक्त केला.

यापप्रसंगी त्यांनी उपस्थित सर्व शेतकरी बांधव, व्यावसायिक मित्र व मान्यवरांशी मनमोकळा संवाद साधला. तरुण पिढी अशा प्रकारे ग्रामीण भागात व्यवसाय सुरू करून इतरांना रोजगार मिळवून देत आहे, ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. या वेळी त्यांनी अंकुश जाधव यांचे मनःपूर्वक कौतुक व अभिनंदन; त्यांच्या या व्यावसायिक प्रवासाला शुभेच्छा दिल्या !

## जालना-नागपूर विशेष रेल्वेच्या एकाच फेरीवर रेल्वे संघर्ष समितीची नाराजी!

### संभाजीनगर-नागपूर दरम्यान नियमित रेल्वे सुरू करण्याची मागणी; लवकरच आंदोलन छेडण्याचा इशारा



जालना : दक्षिण मध्य रेल्वे विभागाच्या वतीने रविवारी जालना-नागपूर विशेष रेल्वे (गाडी क्रमांक ०७०८३) रवाना करण्यात आली. या रेल्वेचे लोको पायलट (मुख्य चालक) फेरोज अहमद आणि सहचालक विशू पाल यांचा जालना रेल्वे संघर्ष समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. मात्र, ही रेल्वे केवळ एकाच फेरीसाठी सुरू करण्यात आल्याने समितीने नाराजी व्यक्त केली आहे. यावेळी जालना रेल्वे संघर्ष समितीचे फेरोज अली, जगदीश चौधरी, ड. शिवराम, डॉ. राधेश्याम जैस्वाल आणि शिवरतन जांगडे यांनी रेल्वे चालकांचा सत्कार करून त्यांचे स्वागत केले. नियमित रेल्वे सुरू करण्याची मागणी दुर्लक्षित? संभाजीनगर ते नागपूरदरम्यान जलद रेल्वे सुरू करण्यात यावी, अशी मागणी जालना रेल्वे संघर्ष समितीच्या वतीने अनेकदा निवेदनांद्वारे करण्यात आली आहे. **(पान ३ वर)**

## जालना जिल्हा पोलीस दलातर्फे पोलीस स्मृती दिनानिमित्त हुतात्मा पोलिसांना अभिवादन; तीन राऊंड फायर करून वाहिली आदरांजली



जालना, दि. २१ ऑक्टोबर २०२६ : देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच नागरिकांच्या संरक्षणासाठी कर्तव्य बजावताना आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या वीर पोलीस हुतात्म्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ जालना जिल्हा पोलीस दलाच्या वतीने पोलीस स्मृती दिन साजरा करण्यात आला. यावेळी कर्तव्य बजावताना शहीद झालेल्या पोलीस अधिकारी व अंमलदारांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करून त्यांच्या शौर्याचे, त्यागाचे आणि कर्तव्यनिष्ठेचे स्मरण करण्यात आले. पोलीस स्मृती दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात हुतात्मा पोलिसांना मानवंदना देण्यात आली. यावेळी तीन राऊंड फायर करून वीर हुतात्मा पोलिसांना सशस्त्र मानवंदना देत जालना जिल्हा पोलीस दलाच्या वतीने आदरांजली अर्पण करण्यात आली. या प्रसंगी पोलीस दलातील अधिकारी व अंमलदारांनी हुतात्मा पोलिसांच्या सर्वोच्च बलिदानाप्रती कृतज्ञता व्यक्त केली. या कार्यक्रमास तेघबीर सिंह संधू, पोलीस अधीक्षक, जालना, डॉ. श्री. विक्रम साळी, अपर **(पान ३ वर)**

## मंठा कृउबा समिती सभापती उपसभापती अविश्वास प्रस्तावाच्या बारगळला, सभापती ए.जे.बोराडे व उपसभापतीपदी गोपाळराव बोराडे कायम

### मंठा बाजार समितीच्या राजकारणात सभापती ठरले 'किंगमेकर'!



**गजानन माळकर पाटील/मंठा** : मंठा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती व उपसभापतीं विरोधात दाखल करण्यात आलेल्या अविश्वास प्रस्तावाच्या पार्श्वभूमीवर रंगलेल्या राजकीय घडामोडींमध्ये अखेर 'एजे' नीती आणि गोपाळराव बोराडे यांच्या राजकीय डावपेचाचा विजय झाला असून, अविश्वास प्रस्ताव बारगळला आहे. या घडामोडीमुळे बाजार समितीतील सत्तासमीकरणांमध्ये 'एजे' गटाचे वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

सभापती व उपसभापतीं विरोधात अविश्वास प्रस्ताव आणण्यासाठी राजकीय पातळीवर भाजपकडून हालचाली सुरू झाल्यानंतर बाजार समितीतील संचालकांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले होते. बाजार समितीमध्ये अविश्वास प्रस्तावावर मतदान घेण्यासाठी बुधवार ता. २१ रोजी जिल्हा पुनर्वसन अधिकारी श्रीमती सुकेशनी पगारे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभा बोलवण्यात आली होती. अविश्वास प्रस्ताव दाखल करणाऱ्या संचालकांची विशेष सभेला गैरहजेरी असल्यामुळे सभापती व उपसभापती वरील अविश्वास प्रस्ताव बारगळला. या विशेष सभेला सभापती ए जे बोराडे, उपसभावती गोपाळराव बोराडे आणि संचालक संतोष वरकड यांची उपस्थिती होती.

**गद्दारांना धडा शिकवणार : ए.जे.बोराडे**

**बाजार समितीमध्ये असलेले वर्चस्व भाजपला सहन होत नाही, त्यांची पोटदुखी वाढली म्हणून अविश्वास आणण्याचे कट कारस्थान त्यांनी रचले. जनतेच्या आशीर्वादाचा हा विजय आहे असे सांगितले. भाजपला योग्य वेळी धडा शिकवू असा इशारा ए जे बोराडे यांनी दिला.**

**शेतकरी बाजार समितीचा केंद्रबिंदू : गोपाळराव बोराडे**

**विरोधकांनी जाणीवपूर्वक अविश्वास आणण्याचा प्रयत्न केला, त्यामध्ये त्यांना अपयश आले. हा विजय सर्वसामान्यांचा व शेतकऱ्यांचा असून शेतकऱ्यांना केंद्रबिंदू म्हणून विकास साधणार असे उपसभापती गोपाळराव बोराडे यांनी सांगितले.**

अविश्वास प्रस्ताव बारगळल्याने प्रस्ताव आणणाऱ्या भाजपच्या गोटाला मोठा राजकीय धक्का बसल्याचे मानले जात आहे. बाजार समितीवरील वर्चस्वाच्या राजकारणात ही घडामोड महत्त्वाची ठरणार असून, आगामी काळात राजकीय समीकरणे आणखी रंगण्याची शक्यता आहे.

या संपूर्ण घडामोडी मागे 'एजे' **(पान ३ वर)**

### जालना कृषी उत्पन्न बाजार समितीतील हमाल, मापाडी व कामगारांना दुष्काळग्रस्त अनुदान द्या!

## जिल्हा असंघटित कामगार व कर्मचारी काँग्रेसचे खासदार कल्याण काळे यांच्याकडे मागणी; शासन दरबारी आवाज उठविण्याचे आवाहन



जालना । प्रतिनिधी : जालना जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात निर्माण झालेल्या तीव्र दुष्काळसदृश परिस्थितीचा फटका शेतकऱ्यांसोबतच कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये काम करणाऱ्या हमाल, मापाडी व असंघटित कामगारांनाही बसत आहे. या कामगारांच्या हाताला काम मिळत नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे शासनाने हमाल, मापाडी व कामगारांना विशेष आर्थिक मदत आणि दुष्काळग्रस्त अनुदान जाहीर करावे, अशी मागणी जालना जिल्हा असंघटित कामगार व कर्मचारी काँग्रेसच्या वतीने खासदार कल्याण काळे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. जिल्हा असंघटित कामगार व कर्मचारी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शेख शमशोद्दीन शेख नूर यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, जालना जिल्ह्यातील गंभीर दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांच्या हातात पीक आलेले नाही. त्याचा थेट परिणाम जालना येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या व्यवहारांवर झाला आहे. बाजारपेठेत आवक रोडावल्यामुळे हमाल, मापाडी व इतर कष्टकरी कामगारांना पुरेसे काम मिळत नसून त्यांच्या कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला आहे. शासनाकडून दुष्काळग्रस्त शेतकरी बांधवांना विविध प्रकारची आर्थिक मदत आणि सवलती दिल्या जातात. त्याच धर्तीवर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या असंघटित हमाल, मापाडी व कामगारांनाही विशेष आर्थिक मदत **(पान ३ वर)**

# संपादकीय

## वारंवार गायब होणार पाऊस

पावसाच्या या शिडकाव्याने कोकणातील शेतकरी काहीसा सुखावला, म्हणजे भाताची ‘जीव जगवणी’ झाली असं त्याला वाटू लागलं. आणि परत पाऊस गायब झाल्याने विहिरीच्या, नदीच्या पाण्याने शेती शिंपून भाताची रोपे जिवंत ठेवण्याचा प्रयत्न काही शेतकरी करत आहेत. गेले दोन दिवस पाऊस थोडावेळ हजेरी लावतो तर अनेक भागांमध्ये कडक उन्हामुळे शेतामध्ये भेगा पडल्या आहेत. परंतु पावसाच्या थोड्यावेळाच्या हजेरीने या शेतजमिनीला पडलेल्या भेगाही भरून निघतील, पण पाऊस पडायला हवा. कोकणातील शेतकरी पावसाच्या प्रतिक्षेत असून कोकणात पावसाचा लपाछपीचा खेळ सुरु आहे.

महाराष्ट्रात पूर्वी कोकण प्रांत भात पिकात अग्रेसर होता. शालेय पाठ्यपुस्तकात भुगोल शिकताना त्यामध्ये कोकणातील पिकांमध्ये भात अग्रस्थानी असल्याचे सांगितले जायचे. कोकणच्या जनतेच्या खाद्य पदार्थांमध्ये भात आणि मासे हे प्रमुख अन्न म्हटले जायचे. कोकणातील रायगड जिल्हा हा सर्वाधिक भात पिकवणारा जिल्हा म्हणून ओळखला जायचा. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात भात, नाचणी पिके घेतली जात. गेल्याकाही वर्षांमध्ये शेतीचं स्वरूप बदलले. कोकणातील अनेक कुटुंब नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने कोकण बाहेर नागपूर, नाशिक, पुणे, मुंबई या शहरीभागात वास्तव्याला गेले. कोकणात कायमस्वरूपी रहाणाऱ्यांची संख्या फारच कमी झाली. यामुळे साहजिकच कोकणातील शेतीवर परिणाम झाला. भातशेती करायची तर किमान कुटुंबांतील चार-सहा शेतात काम करणारी माणसं हवीत. शेतात राबणारे हातच कमी झाले. नोकरी-व्यवसायात तरूण शहरांमध्ये गेले आणि थरथरत्या हातांची समाधानी मनाची वृद्ध माणसं गावात आहेत. परंतु त्यांची शेतात काम करण्याची क्रयशक्तीच उरलेली नाही. परिणामी कोकणातील भातशेतीचे क्षेत्र कमी झाले. अर्थात काहींनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत शेती करण्याचा प्रयत्न केला. परंतु पूर्वीप्रमाणे पारंपरिक पद्धतीची शेतीची अवजारे आता दुर्मिळ होत चालली आहेत. जून महिन्याच्या ७ तारखेला मृग नक्षत्राच्या मुहूर्तावर पावसाचे आगमन होत असे. सुरूवातीच्या काही दिवसांतच पाऊस असा काही बरसायचा की आता पाऊस थांबावा असं शेतकरी म्हणायचा. कोकणातील नदी-नाले, ओहोळ दुथडी भरून वाहायचे. मे महिन्याच्या रणरणता उन्हाळा संपून येणाऱ्या पहिल्या पावसात कोकण हिरवंगार होऊन जायचं. आंबा, काजू, रतांबा आदी फळ पिकांची जोडणी करणारा शेतकरी भात पेरणीसाठी सज्ज असायचा. पावसाचं आगमन कोकणातील शेतकऱ्याला खुणवायचं, भातशेती करणारा शेतकरी किमान वर्षभर कुटुंबाला भात पूरेल अशा पद्धतीने नियोजन करायचा. भात आणि माशांचं कालवण (आमटी) हे प्रमुख अन्न पदार्थ असल्याने भात भरपूर पिकलं की कोकणातील घराघरांत आनंदी वातावरण असायचे. पैशाची श्रीमंती फार नव्हती. कोकणातील शेतकऱ्याच्या गाठीला अधिकचा पैसा नव्हता. जेमतेम मुलांचं शिक्षण दोन वेळचं जेवण मिळतंय याचा कोण आनंद कोकणातील शेतकऱ्याच्या मनात असायचा. घरात वर्षभर खाऊनही भाताची कणगी, मुडी बांधलेली असायची. आता घरात कणगी भरलेलं भात आणि तसा शेतकरी शोधावा लागेल. भाताचा संचय करणारा शेतकरीही आता नाही. असलाच तर रायगड जिल्ह्यातील काही भागात असे शेतकरी असू शकतात. परंतु दक्षिण कोकणात मात्र आता भातशेतीचे क्षेत्र फारच कमी झाले आहे. काही कुटुंबात निष्ठेने, आवड म्हणून आणि कुटुंबाची कोकणची परंपरा म्हणून शेती केली जाते. अशा कुटुंब संस्था आजही एकत्र कुटुंबांचे दर्शन घडवत शेतात राबताना, आनंद घेताना दिसतात. सध्या ऋतुचक्रातील अनियमितता या शेतीच्या आड येऊ लागली आहे. यावर्षी जूनचा पहिला पंधरवडा देखील सुकाच गेला. अखेरीस पाऊस पडला तर पेरणी करावयाची की नाही अशा द्विधा मन:स्थितीत असताना थोडाफार पाऊस पडला त्याचा आधार घेत कोकणातील शेतकऱ्यांनी पेरणी केली. परंतु काही दिवस पावसाने दडी मारल्याने भात पेरणी होऊन देखील भात चांगले उगवेल की नाही याची खात्री उरली नाही. यातच एप्रिल-मे महिन्यात जसा रणरणता उन्हाळा असतो त्यापेक्षाही अधिक उन्हाळा कोकणात जाणवू लागला होता. आता कुठे दोन तीन दिवस पडलेल्या पावसाच्या शिडकाव्याने कोकणातील शेतकरी काहीसा सुखावला, म्हणजे भाताची ‘जीव जगवणी’ झाली असं त्याला वाटू लागलं. अनेक भागांमध्ये कडक उन्हामुळे शेतामध्ये भेगा पडल्या आहेत. परंतु पावसाच्या थोड्या वेळाच्या हजेरीने या शेतजमिनीला पडलेल्या भेगाही जातील. कोकणातील शेतकरी संततधार पावसाच्या प्रतिक्षेत आहे. सध्या कोकणात पावसाचा लपाछपीचा खेळ सुरु आहे. अशावेळी पूर्वी ‘ऊन आणि पाऊस कोल्याचा लगीन’ हे गंमतीच आवर्जून म्हटलं जायचं पण आता हे वाक्य उच्चारण्याची हिम्मतही कोकणातील शेतकऱ्यांमध्ये उरलेली नाही. वारंवार गायब होणारा पाऊस बरसावा याच प्रतिक्षेत कोकणातील शेतकरी आहे.

# ।।।। आझाद हिंद सेना : भारतीय स्वातंत्र्यामागील शक्ती ।।।।

# नेताजींनी ब्रिटिश सैन्यात हिंदुस्तानी सैनिकांचे संघटन केले!

नजरकैदेतून सुटल्यानंतर सुभाषबाबू फेब्रुवारी १९४३ पर्यंत जर्मनीमध्ये राहिले. त्यांनी जर्मन हुकूमशहा हिटलरला अनेकदा भेट दिली आणि भारताला स्वतंत्र करण्यासाठी मदतीचे आवाहन केले. दुसऱ्या महायुद्धात विजयाच्या घोडदौडीत असलेल्या हिटलरने सुभाषचंद्र बोसांना सहकार्य देऊ केले. त्यांनी जर्मनीला शरण गेलेल्या ब्रिटिश सैन्यातील हिंदुस्तानी सैनिकांना प्रबोधन केले. हिंदुस्तानी सैनिक सुभाषचंद्र बोसांच्या व्याख्यानांनी प्रभावित होत आणि स्वातंत्र्याची शपथ घेत असत.

**• आझाद हिंद सेनेची स्थापना आणि ’दिल्ली चलो’ ही घोषणा!**

जर्मनीचा मित्रराष्ट्र असलेल्या जपानचे सैन्य पूर्व आशियाई देशांमध्ये ब्रिटिश सैन्याचा पराभव करत होते. शरण आलेल्या ब्रिटिश सैन्यात हिंदुस्तानी सैनिकही होते. तिथे आधीपासूनच वास्तव्यास असलेल्या राशबिहारी बोस यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या मार्गदर्शनानुसार या हिंदुस्तानी सैनिकांना संघटित करण्यास सुरुवात केली. या सैनिकांना भेटण्यासाठी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी एका जर्मन पाणबुडीतून ९० दिवसांचा प्रवास केला, सर्व अडचणींवर मात केली आणि जुलै १९४३ मध्ये जपानची राजधानी टोकियो येथे पोहोचले. राशबिहारी बोस यांनी या सैन्याचे नेतृत्व नेताजींकडे सोपवले आणि दि.५ जुलै १९४३ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी सिंगापूरमध्ये आझाद हिंद सेनेची स्थापना केली. आपल्या ऐतिहासिक भाषणात हजारो सैनिकांना संबोधित करताना ते म्हणाले, मित्रांनो, सैनिकांनो, तुमची युद्धगर्जना एकच असू द्या! ’’दिल्ली चलो!’’ दिल्लीपर्यंत आपल्यापैकी किती जण वैयक्तिकरित्या जिवंत राहतील हे मला माहीत नाही; पण मला खात्री आहे, विजय आपलाच आहे. म्हणून उभे राहा आणि शस्त्रे उचला. भारतात क्रांतिकारकांनी तुमच्यासाठी आधीच एक मार्ग तयार केला आहे आणि हा मार्ग आपल्याला दिल्लीपर्यंत घेऊन जाईल. दिल्ली चलो!

**• आझाद हिंदच्या हंगामी सरकारचे अधिकृत सैन्य!**

हजारो हिंदुस्तानी सैनिकांची फौज तयार करून आणि भारताच्या स्वातंत्र्यासाठी पूर्व आशियातील लाखो हिंदुस्तानी लोकांचा पाठिंबा मिळवल्यानंतर नेताजींनी दि.२१ ऑक्टोबर १९४३ रोजी स्वतंत्र भारताचे आणखी एक अंतरिम सरकार स्थापन केले. या सरकारला जपान, जर्मनी, चीन, इटली, बर्मा यांनी मान्यता दिली होती. आझाद हिंद सेना ही या सरकारची सेना होती. आझाद हिंद सेना ही सर्व जाती, विविध राज्ये आणि वेगवेगळ्या भाषांतील सैनिकांची सेना होती. सेना एक एकात्मिक एकक होती. ’’कदम कदम बढाये जा’’ हे प्रेरणादायी गीत ओठांवर घेऊन, नेताजी आणि त्यांच्या सैन्याने स्वतंत्र भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी एका विजयी मोहिमेला सुरुवात केली.

**• ’’राणी ऑफ झाँसी’’ रेजिमेंटची स्थापना!**

नेताजींनी राणी झाशीच्या सैन्याच्या धर्तीवर ’’राणी ऑफ झाशी रेजिमेंट’’ची स्थापना केली. पुरुषांसोबत महिलांनीही लष्करी प्रशिक्षणात सहभागी व्हावे, अशी त्यांची ठाम भूमिका होती. नेताजी म्हणायचे, ’’ सन १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात लढाया लढलेल्या राणी झांशी या महिलांसाठी आदर्श असायला हव्यात, जेणेकरून त्या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होऊन भारताला स्वतंत्र करण्याच्या पवित्र कार्यात योगदान देऊ शकतील’’.

**• आझाद हिंद सेनेची आगेकूच!**



आझाद हिंद सेनेने स्थापन केलेल्या सरकारचे सदस्य हेच आझाद हिंद सेनेने स्थापन केलेल्या सरकारचे सदस्य बनले. आझाद हिंद सेनेने ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध बंड करताच, जपानचे राष्ट्राध्यक्ष जनरल तोजो यांनी इंग्लंडकडून जिंकलेली अंदमान आणि निकोबार ही दोन बेटे आझाद हिंद सेनेच्या स्वाधीन केली. दि.२९ डिसेंबर १९४३ रोजी स्वतंत्र भारताचे राष्ट्रप्रमुख म्हणून नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी अंदमानला भेट दिली, ध्वजारोहण केले आणि सेल्युलर जेलमध्ये शिक्षा भोगत असलेल्या क्रांतिकारकांना आदरांजली वाहिली.

नेताजींनी जानेवारी १९४४ मध्ये आपले सैन्य बर्मामध्ये दाखल केले. दिनांक १९ मार्च १९४४ रोजी आझाद हिंद सेनेने भारताच्या भूमीत प्रवेश केला आणि इतिहास घडला. या सैन्याने इम्फाळ, कोहिमा यांसारख्या ठिकाणी ब्रिटिश सैन्याचा पराभव केला. या विजयी प्रसंगी आपल्या भाषणात नेताजी गर्जना करत म्हणाले, ’’आपली मातृभूमी स्वातंत्र्याच्या शोधात आहे! आज, मी तुमच्याकडे सर्वांत आधी एक गोष्ट मागतो. मी तुमच्या रक्ताची मागणी करतो. मला रक्त द्या आणि मी तुम्हाला स्वातंत्र्याचे वचन देतो!’’ हे भाषण इतिहासात अजरामर झाले. त्यांच्या भावपूर्ण शब्दांनी तेथे उपस्थित असलेल्या तरुण हिंदुस्तानी तरुणांना रोमांचित केले आणि त्यांनी आपली शपथ रक्ताने लिहिली.

**• दिल्ली दूरच राहिली!**

मार्च १९४५ पासून जपानला मोठा धक्का बसू लागला. ७ मे १९४५ रोजी जर्मनीने बिनशर्त शरणागती पत्करली आणि १५ ऑगस्ट रोजी जपानने मित्र राष्ट्रांच्या सैन्यासमोर अधिकृतपणे शरणागती पत्करली. जपान-जर्मनीच्या या अनपेक्षित पराभवामुळे सुभाषचंद्रांनी सर्व आशा गमावल्या. १८ ऑगस्ट रोजी सयामच्या प्रवासादरम्यान भारतीय प्रतिकाराची ही तेजस्वी ज्योत विझली, असे सर्वत्र मानले जाते. आझाद हिंद सेना दिल्लीपर्यंत पोहोचू शकली नाही, परंतु तिने बलाढ्य ब्रिटिश साम्राज्यासमोर जे आव्हान उभे केले त्याला इतिहासात तोड नाही. यामुळे ब्रिटिश राजवटीचा पायाच हादरला. हिंदुस्तानी सैनिकांच्या बंडामुळे भविष्यात भारतावर राज्य करणे कठीण होईल, हे ब्रिटिशांच्या लक्षात आले. धूर्त आणि कपटी ब्रिटिश सरकारने हा धोका ओळखला आणि अपमानास्पद माघार घेण्याऐवजी, त्यांनी हा देश सोडून जाण्याचा निर्णय घेतला. ही गोष्ट ब्रिटनच्या तत्कालीन पंतप्रधानांनी कबूल केली होती.

**• ब्रिटिशांची चिंता आणि नेहरूंनी आपल्या भूमिकेत केलेला बदल!**

नेताजींनी सर्वस्व अर्पण करून स्थापन केलेल्या आझाद हिंद सेनेला भारतीयांनी उत्स्फूर्तपणे पाठिंबा दिला. दिल्लीतील लाल किल्ल्यावर इंग्लंडच्या राजाविरुद्ध युद्ध पुकारल्याबद्दल आझाद हिंद सेनेच्या लष्करी अधिकाऱ्यांवर चाललेल्या खटल्यादरम्यान हे दिसून आले. जेव्हा नेताजींनी ब्रिटिश राजवटीविरुद्ध लष्करी हल्ल्याची घोषणा केली, तेव्हा नेहरूंनी त्याविरोधात भूमिका घेतली होती. तथापि, नेताजी बेपत्ता झाल्यानंतर आणि दिल्लीत आझाद हिंद सेनेच्या अधिकाऱ्यांवर खटला सुरू झाल्यावर, संपूर्ण देशातील जनमत त्यांच्या बाजूने होते. आझाद हिंद सेनेची लोकप्रियता पाहून अखेरीस नेहरूंनी आपली भूमिका बदलली आणि ते स्वतः आझाद हिंद सेनेच्या अधिकाऱ्यांचे बचाव वकील बनले. कोर्ट मार्शलमध्ये तिन्ही अधिकारी दोषी आढळले. तरीही त्यांना माफ करण्यात आले, कारण ब्रिटिश शासकांना हे लक्षात आले होते की, जर नेताजींच्या सहकाऱ्यांना शिक्षा झाली, तर देशातील ९० वर्षांच्या राजवटीत कधीही न पाहिलेला आक्रोश होईल. आझाद हिंद सेनेच्या सैनिकांनी केलेल्या निःस्वार्थ राष्ट्रसेवेने लाखो देशवासियांच्या मनात स्वातंत्र्याची आकांक्षा निर्माण केली होती. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

**!! आझाद हिंद सेना स्थापना दिनाच्या सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!**

# अभिनेता टायगर श्रॉफवरील हल्ल्याप्रकरणातील आरोपींना ३१ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी



मुंबई: अभिनेता टायगर श्रॉफ याच्यावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी तीन मुख्य आरोपींना मुंबई न्यायालयाने ३१ ऑक्टोबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. आरोपींना १९ ऑक्टोबर रोजी राजस्थानातील कोटा येथून मुंबईत आणण्यात आले होते. अटक करण्यात आलेल्या व्यक्तींमध्ये हरियाणातील सोनिपत येथील रेहान उर्फ सुक्का, मूळचा बिहारमधील बेगुसराईचा आणि मुंबईत राहणारा हृतिक कुर्मी उर्फ रोशन आणि हरियाणातील फुल सिंग यांचा समावेश आहे. गुन्हे शाखेने या तिन्ही आरोपींना दंडाधिकारी न्यायालयात हजर करून पोलीस कोठडीची मागणी केली. गुन्ह्यात वापरलेली शस्त्रे हस्तगत करायची आहेत, असे तपास यंत्रणेने न्यायालयाला सांगितले आणि आरोपीने दोन फोन नष्ट केल्याचा आरोप केला. घटनेमागील कट आणि हेतू उघडकीस आणण्यासाठी कोठडी आवश्यक होती, असे पोलिसांनी एका वृत्तसंस्थेस सांगितले. तिघांच्या पोलीस कोठडीला त्यांचे बचाव वकील अजिंक्य मिर्गल आणि सत्यब्रत जोशी यांनी विरोध केला. शस्त्रे जप्त करण्यासाठी कोठडीची आवश्यकता नाही, असा युक्तिवाद त्यांनी केला. त्यांनी आपल्या निवेदनात हेदेखील अधोरेखित केले की, आरोपी ट्रान्झिट रिमांडवर असताना त्यांची चौकशी करण्यात आली होती. न्यायालयाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून आरोपींना ३१ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. रविवारी (१८ ऑक्टोबर) संध्याकाळी सात वाजण्याच्या सुमारास अभिनेता टायगर श्रॉफच्या गाडीवर गोळीबार झाला. ही घटना जुहू येथील पुष्पा पार्क परिसरात घडली. टायगर श्रॉफ एका मैदानावर फुटबॉल मॅच खेळून त्याच्या कारमधून घरी परतत होता. तिथे त्याला पाहण्यासाठी चाहत्यांची मोठी गर्दी जमली होती. याच गर्दीचा फायदा घेत दुचाकीवरून आलेल्या तीन अज्ञात हल्लेखोरांनी टायगरच्या गाडीवर ५ ते ६ राऊंड गोळीबार केला आणि तिथून पळ काढला.या प्राणघातक हल्ल्यात अभिनेता सुखरूप बचावला, पण गाडीच्या चालकाला आणि चाहत्याला गोळी लागली. तीन अज्ञात तरुणांनी दुचाकीवरून येऊन हा हल्ला घडवला. दरम्यान, या प्रकरणी मुंबई पोलिस आणि कोटा पोलिस यांच्या एकत्रित तपासात तीन संशयितांना सोमवारी सकाळी राजस्थानातील कोटा येथून ताब्यात घेण्यात आले.

# कलियुग के श्याम : बाबा खाटू श्याम की अद्भुत महिमा !

## महाभारताच्या रणांगणापासून खाटू धामापर्यंतचा बर्बरीकाचा प्रेरणादायी प्रवास

जालना : भक्तांच्या हाकेला धावून येणारे, दुःख दूर करून भक्तांच्या मनोकामना पूर्ण करणारे आणि कलियुगात ‘हारे का सहारा, बाबा खाटू श्याम हमारा’ या जयघोषाने देशभरातील कोट्यवधी भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र बनलेले बाबा खाटू श्याम यांची महिमा अपार आहे. राजस्थानातील सीकर जिल्ह्यातील खाटू येथे विराजमान असलेल्या बाबा श्याम यांना ‘शीश के दानी’, ‘लखदातार’, ‘खाटू नरेश’ आणि ‘मोरवीनंदन’ अशा विविध नावांनी ओळखले जाते. मात्र, या नावांमागे असलेली पौराणिक कथा अनेकांसाठी तितकीच रोचक आणि प्रेरणादायी आहे. महाभारतातील बर्बरीक म्हणजेच आजचे बाबा खाटू श्याम यांची कथा त्याग, शौर्य, वचनपालन आणि भगवान श्रीकृष्णावरील श्रद्धेचा अद्भुत संगम आहे.

**पांडवांच्या वनवासात बर्बरीकाच्या कथेची सुरुवात**

पौराणिक कथेनुसार, कौरवांचा राजा दुर्योधन याने पांडवांना त्रास देण्यासाठी आणि त्यांचा नाश करण्यासाठी लाक्षागृहाची योजना आखली होती. मात्र, पांडव या संकटातून बचावले आणि वनात राहू लागले. त्याच काळात हिडिंब नावाचा राक्षस आपल्या बहिणी हिडिंबेसह वनात राहत होता. एकदा पांडव वनात विश्रांती घेत असताना भीमाच्या सामर्थ्याने प्रभावित झालेल्या हिडिंबेच्या मनात भीमाबद्दल प्रेमभावना निर्माण झाली. पुढे हिडिंबा आणि भीम यांचा विवाह झाला. त्यांना बर्बरीक नावाचा पराक्रमी पुत्र झाला. बर्बरीकाने पुढे कठोर साधना करून अद्भुत शक्ती प्राप्त केल्या. काळानुसार बर्बरीक शूर योद्धा म्हणून प्रसिद्ध झाला. त्याच्याकडे असलेल्या विलक्षण सामर्थ्यामुळे तो महाभारताच्या युद्धातील महत्त्वाचा घटक ठरू शकला असता.

**तीन बाणांचे सामर्थ्य आणि भगवान श्रीकृष्णांची परीक्षा**

पौराणिक मान्यतेनुसार, बर्बरीकाकडे तीन दिव्य बाण होते. या तीन बाणांच्या साहाय्याने तो संपूर्ण सैन्याचा नाश करू शकत होता. महाभारताचे युद्ध सुरू होण्यापूर्वी बर्बरीकाने युद्धात सहभागी होण्याचा निर्णय घेतला. त्याने आपल्या आईला वचन दिले होते की, युद्धात जो पक्ष दुर्बल असेल, त्याला तो साथ देईल. हे वचन पाळण्याच्या निर्धाराने तो आपल्या निळ्या घोड्यावर स्वार होऊन कुरुक्षेत्राच्या दिशेने निघाला. मात्र, भगवान श्रीकृष्णांना बर्बरीकाच्या सामर्थ्याची आणि त्याच्या वचनामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीची जाणीव होती. बर्बरीकाने दुर्बल पक्षाला साथ देण्याचे वचन पाळले असते, तर युद्धात परिस्थिती बदलताच त्याला वारंवार पक्ष बदलावा लागला असता. परिणामी, त्याच्या दिव्य बाणांमुळे संपूर्ण युद्धाचे संतुलन बिघडण्याची शक्यता होती. त्यामुळे भगवान श्रीकृष्णांनी ब्राह्मणाचे रूप धारण करून बर्बरीकाची परीक्षा घेण्याचे ठरवले.

**‘शीश के दानी’ ही उपाधी कशी मिळाली?**

भगवान श्रीकृष्णांनी ब्राह्मणाच्या वेशात बर्बरीकाला त्याच्या सामर्थ्याविषयी विचारले. बर्बरीकाने आपल्या तीन बाणांच्या अद्भुत शक्तीचे वर्णन केले. त्यावर श्रीकृष्णांनी त्याला समोरच्या पिंपळाच्या झाडाची सर्व पाने एका बाणाने वेधून दाखवण्याचे आव्हान दिले. बर्बरीकाने आव्हान स्वीकारले. त्याने बाण सोडताच तो झाडाच्या पानांना वेधू लागला. श्रीकृष्णांनी परीक्षा घेण्यासाठी आपल्या पायाखाली एक पान लपवले होते. बाण त्या पानाभोवती घिरट्या घालू लागला. श्रीकृष्णांनी पाय बाजूला घेतल्यानंतर बाणाने ते पानही वेधले. बर्बरीकाचे सामर्थ्य पाहून श्रीकृष्णांना त्याच्या पराक्रमाची खात्री पटली. त्यानंतर त्यांनी बर्बरीकाकडे दान मागितले. बर्बरीकाने कोणतेही दान देण्याचे वचन दिले. तेव्हा श्रीकृष्णांनी त्याच्याकडे त्याच्या मस्तकाचे दान मागितले. दिलेल्या वचनाला जागणाऱ्या बर्बरीकाने युद्ध पाहण्याची इच्छा व्यक्त केली. भगवान श्रीकृष्णांनी त्याची इच्छा मान्य केली आणि बर्बरीकाने स्वत:चे मस्तक अर्पण केले. त्याच्या या अतुलनीय त्यागामुळे त्याला ‘शीश के दानी’ म्हणून ओळखले जाऊ लागले.

**१८ दिवसांच्या युद्धाचा साक्षीदार**

पौराणिक कथेनुसार, बर्बरीकाचे मस्तक भगवान श्रीकृष्णांनी अमृततुल्य औषधींच्या साहाय्याने एका उंच पर्वतावरील पिंपळाच्या झाडावर स्थापित केले, जेणेकरून त्याला महाभारताचे संपूर्ण युद्ध पाहता येईल. कुरुक्षेत्रावर १८ दिवस चाललेल्या युद्धात बर्बरीकाने पांडवांचा विजय पाहिला. युद्ध संपल्यानंतर पांडवांमध्ये विजयाचे श्रेय कोणाला द्यावे, यावर चर्चा सुरू झाली. प्रत्येकाला आपल्या पराक्रमाचा अभिमान होता. मात्र, बर्बरीकाच्या मस्तकाने सांगितले की, युद्धात भगवान श्रीकृष्णांचे सुदर्शन चक्रच निर्णायक ठरले. विजयामागे श्रीकृष्णांची रणनीती, मार्गदर्शन आणि दैवी शक्ती होती. या कथेतून अहंकारापेक्षा समर्पण आणि ईश्वरी इच्छेचे महत्त्व अधोरेखित होते.

**कलियुगात बाबा श्याम म्हणून पूजले जाण्याचे वरदान**




**धार्मिक चर्चा ।**
**श्रीकांत पाराशर, पुष्कर**

बर्बरीकाच्या त्यागावर आणि भक्तीवर प्रसन्न होऊन भगवान श्रीकृष्णांनी त्याला वरदान दिले की, कलियुगात त्याची पूजा ‘श्याम’ या नावाने केली जाईल. त्याच्या स्मरणाने भक्तांच्या मनोकामना पूर्ण होतील आणि दुःखाच्या काळात त्याला शरण आलेल्या भक्तांना आधार मिळेल, अशी श्रद्धा आहे. आज राजस्थानातील सीकर जिल्ह्यातील खाटू धाम हे बाबा खाटू श्याम यांच्या भक्तीचे प्रमुख केंद्र आहे. देशभरातून लाखो भाविक येथे दर्शनासाठी येतात. विशेषत: फाल्गुन महिन्यात भरणाऱ्या मेळ्यात भक्तांची मोठी गर्दी होते. ‘हारे का सहारा, बाबा श्याम हमारा’ हा जयघोष भक्तांच्या मनातील श्रद्धा, विश्वास आणि समर्पण व्यक्त करतो. संकटाच्या काळात आधार देणारे आणि भक्तांना नवी उमेद देणारे देवस्थान म्हणून खाटू श्याम धामाची ओळख निर्माण झाली आहे.

**त्याग, वचन आणि भक्तीचा संदेश**

बाबा खाटू श्याम यांची पौराणिक कथा केवळ एका महान योद्ध्याच्या बलिदानाची गाथा नाही, तर वचनपालन, निःस्वार्थ त्याग आणि ईश्वराप्रती समर्पण यांचा संदेश देणारी आहे. बर्बरीकाने आपल्या वचनासाठी सर्वोच्च त्याग केला, तर भगवान श्रीकृष्णांनी त्याच्या भक्तीला अमरत्व दिले, अशी भाविकांची श्रद्धा आहे.

**म्हणूनच आजही लाखो भाविक श्रद्धेने म्हणतात तीन बाणधारी, शीश के दानी, हारे का सहारा जय श्री श्याम!**

**।। जय श्री श्याम ।।**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✽ यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO.MHMAR/26/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

पान १ वरुन

## उद्या पदवीधर मतदारसंघाची

यावा, यासाठी मतदान केंद्रांवरील प्रवेश व्यवस्था, आवश्यक सुविधा, दिशादर्शक सूचना आणि मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त कर्मचाऱ्यांची सज्जता यांची खातरजमा करण्यावर भर देण्यात आला. मतदान साहित्याचे वितरण, मतपेट्यांची सुरक्षित वाहतूक, मतदानानंतर मतपेट्या जमा करण्याची व्यवस्था आणि मतमोजणी केंद्रावरील तयारी याबाबतही संबंधित जिल्हा प्रशासनाला आवश्यक सूचना देण्यात आल्या. औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघात आठ जिल्ह्यांचा समावेश असून, निवडणुकीसाठी ४१ उमेदवार रिंगणात आहेत. निवडणुकीसाठी एकूण ३ लाख २६ हजार ७०१ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. आठ जिल्ह्यांमध्ये ८४२ केंद्रांवर मतदान होणार आहे. शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होणार आहे. मतपत्रिकेवर पसंतीक्रम नोंदवून मतदान करावयाचे असल्याने मतदारांना योग्य पद्धतीने मतदान करण्याबाबत मार्गदर्शन करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.⁄ निवडणूक प्रक्रिया शांततेत व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी सतर्क राहावे. मतदानाच्या दिवशी उद्भवणाऱ्या संभाव्य अडचणींवर तातडीने उपाययोजना कराव्यात आणि सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वय राखावा, असे निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी यावेळी दिले.

## अधर्मावर धर्माचा आणि

त्यांच्या मदतीसाठी सरकार तयारी करत आहे आणि या परिस्थितीवर मात करण्यासाठी लवकरच उपाययोजना केल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले. शेवटी त्यांनी उपस्थितांना विजयादशमीच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. आकर्षक आतषबाजी आणि जयघोष

कार्यक्रमात रावणाच्या पुतळ्याचे दहन अत्यंत आकर्षक व रंगिबेरंगी आतषबाजीच्या सहाय्याने करण्यात आले. रावण दहन होताच प्रभू श्रीरामांच्या विजयाचा जयघोष करत उपस्थितांनी सियावर रामचंद्र की जय आणि जय श्री राम च्या घोषणा दिल्या, ज्यामुळे संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. या सोहळ्यानंतर उपस्थितांनी एकमेकांना आपट्याची पाने देऊन 'सोनेरी' शुभेच्छा दिल्या. मान्यवरांच्या प्रमुख उपस्थिती

या भव्य सोहळ्यास राहुल लोणीकर, नितीन जेथलिया, मोहन अग्रवाल, शहाजी राक्षे, आकाश राक्षे, प्राचार्य डॉ. भगवानराव दिरंगे, संपत टकले, गणेश नळगे, राजाभाऊ पवार, प्रकाश चव्हाण, भगवानराव मोरे, दया काटे, ओम मोरे, संदिप बाहेकर, विनायकराव काळे, मनोहर खालापुरे, विजय नाना राखे, प्रा पाडूरंग नवल राजेश खंडेलवाल, बाबुराव हिवाळे, सावता काळे, आबा कदम, सोनू अग्रवाल, सतीष सोनोने, राजेश भुजबळ, निहील सकलेचा , अमोल अग्रवाल राजेश मस्के , ऋषिकेश कराळे, शाकेर खतीब, कदीर कुरेशी, कृष्णा आरगडे, अजिज सौदागर, संजय राऊत यांच्यासह सर्व राजकीय पक्षांचे आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार बांधव आणि मोठ्या संख्येने सन्माननीय नागरिक उपस्थित होते. सुव्यवस्था आणि परिश्रम कार्यक्रमात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासन तसेच नगरपालिकाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दसरा उत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार भारूका, कैलास सोळंके, अजय देसाई, माणिक जैस्वाल तसेच समितीच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी आयोजकांनी उपस्थित सर्व नागरिकांचे आभार मानले.

पान १ वरुन

## भोकरदन शहरात वाहतूक

व्यापारी व फेरीवाल्यांना रोजगाराची संधी मिळण्यासोबतच नागरिकांनाही खरेदीसाठी सोयीस्कर व्यवस्था उपलब्ध होऊ शकते. स्वच्छता आणि सुरक्षिततेवर भर प्रस्तावित 'उत्सव मार्केट'मध्ये स्टॉलधारकांसाठी निश्चित जागा, नागरिकांना ये-जा करण्यासाठी मोकळी जागा, स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनाची योग्य व्यवस्था करण्यात यावी. तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी नगरसेवक सुमित थारेवाल, शंकर सपकाळ यांच्यासह बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## जालना-नागपूर विशेष

संभाजीनगर ते नागपूरदरम्यान दररोज ५० ते ६० लक्झरी वाहने तसेच महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बस धावतात. यावरून या मार्गावर मोठ्या प्रमाणात प्रवासी वाहतूक होत असल्याचे स्पष्ट होते. अशा परिस्थितीत संभाजीनगर, जालना, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यांतील प्रवाशांची गरज लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेने संभाजीनगर-जालना-परभणी-हिंगोली मार्गे नागपूरसाठी नियमित जलद रेल्वे सुरू करावी, अशी मागणी समितीने पुन्हा एकदा केली आहे. मागणी मान्य न झाल्यास आंदोलनाचा इशारा विशेष रेल्वेची केवळ एकच फेरी न ठेवता या मार्गावर नियमित रेल्वेसेवा सुरू करावी. मराठवाड्यातील प्रवाशांना नागपूरला जाण्यासाठी सोयीस्कर आणि जलद रेल्वे उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी रेल्वे संघर्ष समितीने केली आहे. रेल्वे प्रशासनाने या मागणीकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास लवकरच आंदोलन छेडण्यात येणार असल्याचा इशाराही जालना रेल्वे संघर्ष समितीच्या वतीने देण्यात आला आहे.

## जालना जिल्हा पोलीस

पोलीस अधीक्षक, जालना, जिल्ह्यातील सर्व पोलीस उपअधीक्षक, सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी तसेच पोलीस दलातील अंमलदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. हुतात्मा पोलिसांचे बलिदान सदैव प्रेरणादायी! पोलीस दल हे समाजाच्या सुरक्षिततेचे कवच असून,

पान १ वरुन

नागरिकांचे संरक्षण करणे, गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवणे आणि समाजात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे ही पोलिसांची महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे. ही जबाबदारी पार पाडताना अनेक पोलीस अधिकारी व अंमलदारांनी आपल्या प्राणांची पर्वा न करता देशसेवेला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. त्यांच्या या अतुलनीय त्यागामुळेच समाजात सुरक्षिततेची भावना दृढ होते. पोलीस स्मृती दिन हा केवळ हुतात्म्यांच्या स्मरणाचा दिवस नसून, त्यांच्या शौर्याचा आणि कर्तव्यनिष्ठेचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून समाजाच्या सुरक्षेसाठी अधिक जबाबदारीने कार्य करण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे. हुतात्मा पोलिसांनी दाखविलेल्या धैर्याचा आणि समर्पणाचा वारसा पुढे चालविण्याचा संकल्प यानिमित्ताने व्यक्त करण्यात आला. जालना जिल्हा पोलीस दलाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमातून देशासाठी आणि समाजाच्या सुरक्षिततेसाठी प्राणार्पण करणाऱ्या सर्व वीर पोलीस हुतात्म्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. त्यांच्या बलिदानाची आठवण सदैव प्रेरणा देत राहील, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

## जालना कृषी उत्पन्न बाजार

जाहीर करण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. कामगारांच्या प्रश्नासाठी शासनदरबारी आवाज उठविण्याचे आवाहन दुष्काळामुळे रोजगार हिरावला गेल्याने या कष्टकरी वर्गासमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. अशा परिस्थितीत शासनाने त्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने मदत उपलब्ध करून द्यावी. तसेच खासदार कल्याण काळे यांनी हा प्रश्न शासनदरबारी आणि विधिमंडळाच्या स्तरावर उपस्थित करून हमाल, मापाडी व कामगारांना न्याय मिळवून द्यावा, अशी विनंती निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष शेख शमशोद्दीन यांच्यासह सैयद शफीक, ख्वाजा शेख, शेख मुख्तार, राशिद चौधरी, विलास, रमजानी भाई, शेख अशफाक, शेख अयूब, सत्तार भाई, शेख अब्बास, सैयद अतीक, मोहम्मद परसों वाले आदी उपस्थित होते. कष्टकरी कामगारांना दुष्काळाच्या संकटातून दिलासा देण्यासाठी शासनाने तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी जिल्हा असंघटित कामगार व कर्मचारी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे.

## मंठा कृउबा समिती

गटाची आणि गोपाळराव बोराडे यांच्या राजकीय अनुभवाची पकड मजबूत असल्याचे या निकालातून दिसून आले. या घडामोडीनंतर बाजार समितीतील आगामी निर्णय आणि राजकीय हालचालींकडे आता तालुक्याचे लक्ष लागले आहे. या सर्व घडामोडी माजी आमदार राजेश राठोड, गोपाळराव बोराडे, ड. पंकज बोराडे, केशव महाराज सरकटे, संतोष वरकड व संचालकांची भूमिका महत्त्वाची ठरली. यावेळी विविध पक्षाचे पदाधिकारी, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### औषधसंहिता ..

हवे कशाला डॉक्टर
रे सर्दी पडशा करता
दवाखान्यात जायचे
भलता आग्रह धरता

पाळत नाही आपण
कधी औषध संहिता
मनाने घेऊन औषधे
ळबाधा आणतो हिता

जुन्याप्रिस्किप्शनवर
कशीही औषधे घेता
दोष आजार पणाचा
अवघ्या जगांला देता

डॉक्टरां पेक्षा विद्वान
बरा मेडिसिनविक्रेता
हवेत असे गि-हाईक
आपणांसारखा क्रेता

फी वाचवावी वैद्यांची
त्रास नको तो नसता
असाचं हवा जादुगार
ऋग्णांस ना तपासता

एक्सपायरी डेट काय
कशास उगाचं पाहता
नंतर सोसत बसायचे
रे रिक्शनची दाहता

चिंता वाढवी सर्वांची
वैद्यकीय खर्च वाढता
निर्माण होतात बवाल
विचित्र कुठेही घडता

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

### अशोक ..

पक्ष त्यागून चालले
चकीत होतात लोक
आता पडेलंभगदाड
बुजवले नाही भोक

प्रत्येक कार्यकर्त्यास
तीक्ष्ण नजरेत जोख
कोण असे निष्ठावंत
जयघोषकरता घोख

स्पष्टता जर विचारा
विरूनजाई काळोख
पक्ष बांधणी जाग्रत
पसरेलं निष्ठाआलोक

कोण आपला परका
मना नसावा किंतोक
निडर भक्कम स्थीर
पळून जाती डरपोक

अंदाज न समस्येचा
शेवटचे कुठले टोक
तरूनजातीलं सावध
दंशीत होई बिनडोक

उंदरे पळू लागताना
उतरे सर्व झाकझोक
कोण खरेचं पक्षनिष्ठ
कुणाचे चालले झोक

गळणारी गळो पाने
गेलेल्याचे नकोशोक
सितारामाची आठव
वृक्ष बागेतले अशोक

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

### रमी कर्मी ..

नव जुगार बोकाळे
रंगे ऑन लाईन रमी
बोटे करतात नर्तन
सारे खेळण्यात रमी

माहीतअसूनि जाळे
शांत ते पोलिसकर्मी
सेलिब्रिटी जाहिराती
कमाईकरती विक्रमी

फसू लागे साधेभोळे
डोके भोंगाळचक्रमी
चकाकूनजाती डोळे
विजयाची मिळे हमी

कुणा कसे कळेना हे
पोखरत जाती कृमि
बंधन नाही वेळेचे ते
फसे मृगजळ संभ्रमी

वैधानिक इशारे देती
कृत्ये खुशहालहरामी
केले होते सतर्क पूर्वी
आवाजा येई बेशरमी

एकास पाहून दुस-या
खेळाचीयेई खुमखुमी
सांधत जाते साखळी
हीचं आयडियाहुकमी

वेळआता अधीर पहा
घालायचा घाव वरमी
सहनशीलता टोकाची
गाजाआड हो कुकर्मी

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

### वातावरण ..

पुन्हा पुलकित मैत्री
तापलेले वातावरण
काहिही घडते येथे
नाम हे राज कारण

जसासमोरचा योध्दा
तसे चिलखत धारण
अ तर्क्य आकस्मिक
बदलत रहावे धोरण

घनिष्ठसहकारीसोडा
करा धुत्कारपाठवण
पडद्याड गेलेल्यांची
का सत्कारे आठवण

बुजगावणी इतस्ततः
पाखरेहाकले गोफण
अर्धमेले झाले त्यावर
करतो अमृत शिंपण

माफीदेणार ना कुणा
रे इतकेआपणकृपण
मागणार नाही माफी
नावडे मनातलादर्पण

दोषी ठरवायला दुजा
डागी अण्वस्त्र क्षेपण
आमचे सगळे बरोबर
नसा नसात अहम्पण

सकस मातीत बंगला
दगडावर बीजारोपण
शक्ती भोवती कुंपण
उगा मग घेतो दडपण

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# आणि माझा दसरा गोड झाला !

आज सकाळी नेहमीप्रमाणे पहाटे ५ वाजता माझा स्वीय सहाय्यक विशाल याच्यासोबत मॉर्निंग वॉकसाठी निघालो होतो. सकाळच्या प्रसन्न वातावरणात फेरफटका मारून घरी परतत असताना स्टेशन रोडवर एका झाडाखाली बसलेली ती वृद्ध मायमाऊली पुन्हा दिसली आणि माझी पावले क्षणभर थबकली. थकलेली, आयुष्याच्या संध्याकाळी कोणाचाही आधार नसलेली; मात्र जगण्यासाठी धडपड करणारी ती मायमाऊली तिची अवस्था पाहून मन नेहमीच हेलावून जायचे. रेल्वे स्टेशनचा मोकळा परिसर हेच तिचे निवासस्थान आणि तेथील उघडे आकाश हेच तिचे छत! पहाटे साडेपाच ते पावणेसहाच्या सुमारास ती आपल्या मळक्या कपड्यांचे गाठोडे सोबत घेऊन रेल्वे स्टेशनच्या उड्डाणपुलाकडे जाताना अनेकदा दिसायची. मॉर्निंग वॉकला निघालो की तिची भेट ठरलेलीच.

एवढ्या सकाळी एखादी व्यक्ती दिसली की ती अत्यंत आर्त स्वरात म्हणायची, भाऊ, मला चहा द्या पाच रुपये द्या, दोन रुपये द्या तिच्या या विनवणीने काळीज पिळवटून निघायचे. खिशात असतील ते १००, ५० रुपये तिच्या हातावर ठेवले की तिच्या चेहऱ्यावर उमटणारा आनंद पाहून मन भरून यायचे. तिला पाहिल्यानंतर मनात अनेक प्रश्न निर्माण व्हायचे. ती आजारी पडली तर तिला दवाखान्यात कोण नेणार? ऊन, वारा, पाऊस आणि थंडी यांचा सामना ती कशी करत असेल? तिच्या पोटात दोन घास अन्न जात असतील



का? अशा एक ना अनेक प्रश्नांनी मन अस्वस्थ व्हायचे. आजही घरी परतत असताना ती नेहमीच्या झाडाखाली बसलेली दिसली. तिचा तोच करुण चेहरा आणि बाजूला ठेवलेले कपड्यांचे गाठोडे मला पाहताच ती म्हणाली, भाऊ, तुम्ही मला साडी देणार होते ना? तिचे हे शब्द कानावर पडताच मला आठवले की, आपण तिला साडी देण्याचे आश्वासन दिले होते; मात्र ते पूर्ण करायचे राहून गेले होते. क्षणभर मनात अपराधीपणाची भावना आली. मी तिथूनच माझ्या पत्नीला फोन केला आणि दोन साड्या मागवून घेतल्या. त्या साड्या जेव्हा त्या मायमाऊलीच्या हातात ठेवल्या, तेव्हा तिच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद शब्दांत व्यक्त करणे खरोखरच कठीण होते. आज आपण विजयादशमीनिमित्त आपट्याची पाने सोनं म्हणून एकमेकांना देतो. त्या परंपरेतही आनंद आहेच; पण या निराधार मायमाऊलीच्या हातात साड्या देऊन तिच्या चेहऱ्यावर फुललेला आनंद पाहताना मनाला जो समाधानाचा अनुभव आला, तो शब्दांपलीकडचा होता. तिच्या डोळ्यांत तरळलेले अश्रू, चेहऱ्यावर उमटलेले समाधान आणि तिच्या मनातील आनंद पाहून मनही भरून आले. आजचा माझा दसरा खऱ्या अर्थाने गोड झाला! सण साजरे करताना केवळ परंपरांमधून आनंद आणि ईश्वर शोधण्यापेक्षा, समाजातील रंजल्या-गांजल्या, निराधार आणि गरजू माणसांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्यातही ईश्वराचे दर्शन घडते. कारण, एखाद्याला दिलेली भेट किती मोठी आहे, यापेक्षा त्या भेटीमुळे त्याच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद कितीतरी मोठा असतो.

माणसातच देव शोधावा आणि
माणुसकीतूनच सणाचा खरा आनंद
अनुभवावा!
संतविचारांचा हाच भाव मनात ठेवून-
ज्यासी आपंगिता नाही,
त्यासी धरी जो हृदयी
आपणा सर्वांना विजयादशमीच्या मनःपूर्वक शुभेच्छा!
समाजात प्रेम, आपुलकी आणि
माणुसकीची भावना
सदैव वृद्धिंगत होवो, हीच सदिच्छा.

**भास्कर अंबेकर**
**जिल्हा संपर्कप्रमुख तथा**
**माजी नगराध्यक्ष, जालना**

# उसनवारी नियुक्त्यांना चाप

मुंबई : मंत्री कार्यालयांतील उसनवारी आणि मौखिक नियुक्त्यांना चाप लावल्यानंतर निर्माण झालेली मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यासाठी राज्य शासनाने सावधि पदांच्या संख्येत वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. सामान्य प्रशासन विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, मुख्यमंत्री सचिवालयात ४१, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या कार्यालयांत प्रत्येकी १८, तर कॅबिनेट मंत्री आणि राज्यमंत्र्यांच्या कार्यालयांत प्रत्येकी चार अतिरिक्त पदांना मंजुरी देण्यात आली आहे. ही पदे विद्यमान मंत्रिमंडळाच्या कार्यकाळापुरती तात्पुरती असतील. मंजूर मनुष्यबळाव्यतिरिक्त उसनवारी किंवा मौखिक आदेशाने कर्मचाऱ्यांची नियुक्ती करता येणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. मंत्री कार्यालयांमध्ये विहित कार्यपद्धतीचे पालन न करता परस्पर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जात असल्याच्या तक्रारीनंतर मुख्यमंत्री कार्यालयाने अलीकडेच कारवाई केली होती. अशा पद्धतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ विभागातील पदांवर तातडीने रुजू होण्याचे आदेश देण्यात आले. १० सप्टेंबर २०२६ पर्यंत सर्व संबंधित अधिकारी-कर्मचारी मूळ विभागात परततील, याची दक्षता घेण्यात आली. मुख्यमंत्री कार्यालयानेच कारवाई केल्याने मंत्र्यांना आपल्या कार्यालयांतील अतिरिक्त कर्मचाऱ्यांना परत पाठवावे लागले. परिणामी, मनुष्यबळाची कमतरता जाणवू लागल्याने सावधि पदांची संख्या वाढविण्याची मागणी मंत्र्यांकडून करण्यात आली होती. त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाने अतिरिक्त पदांना मान्यता दिली आहे.

पान ४ वरुन...

## अपर जिल्हादंडाधिकारी

किंवा प्रवर्तक शस्त्रे गोळा करुन ठेवणार नाही किंवा जवळ बाळगणार नाही. व्यक्तींच्या किंवा समुहाच्या भावना जाणुनबुजुन दुखविण्याचे उद्देशाने असभ्यतेने भाषण म्हणणार नाही, वाद्य वाजविणार नाही, गाणे म्हणणार नाही. व्यक्तिंचे किंवा शवाचे किंवा त्याच्या प्रतिकृतीचे प्रदर्शन करणार नाही. आवेषी भाषण, अंगविक्षेप,विडंबनापर नकला करणार नाही आणि सभ्यता किंवा नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा कोणतीही वस्तु बाळगणार नाही. त्याकरीता पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (३) अन्वये पाच किंवा अधिक व्यक्तींना जमण्यास किंवा सभा, मिरवणुका, मोर्चा काढण्यास मनाई केली आहे.

हा आदेश कामावरील कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी यांना लागु होणार नाही. तसेच विवाह, अंत्ययात्रा आणि पोलीस अधिक्षक जालना व उपविभागीय पोलीस अधिकारी जालना, अंबड, परतुर, भोकरदन यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुका, सभा, मोर्चा यांना लागु राहणार नाही. हा आदेश संपुर्ण जिल्ह्यासाठी दि. २२ ऑक्टोबर, २०२६ रोजीच्या ६.०० वाजेपासुन ते दि. ४ नोव्हेंबर, २०२६ रोजीचे रात्री १२.०० वाजेपर्यंत अंमलात राहील. असे आदेशात नमुद करण्यात आले आहे.

## निधोना रोडवरील नदीकाठी

हातात काळ्या रंगाचा दोरा असल्याचे वर्णन पोलिसांनी दिले आहे. ओळख पटविण्यासाठी पोलिसांचे आवाहन सदर तरुणाची ओळख पटविण्यासाठी चंदनझिरा पोलीस प्रयत्न करीत आहेत. या वर्णनाशी साधर्म्य असलेली व्यक्ती बेपत्ता असल्यास किंवा मृत तरुणाबाबत कोणाला काही माहिती असल्यास त्यांनी तातडीने चंदनझिरा पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा. नागरिकांकडे असलेली माहिती मृत तरुणाची ओळख पटविण्यासाठी महत्त्वाची ठरू शकते. मृत तरुणाची ओळख पटविण्यासाठी नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या घटनेविषयी पोलीस पुढील तपास करीत आहे.

## विजया दशमीच्या मुहूर्तावर

लिपने, संतोष काबरा, अशोक तनपुरे, भगवानराव काकडे, भगवान वडे, श्रीराम गोरे, शिवाजी वडे, गजानन काकडे यांच्यासह बाजार समितीचे कर्मचारी भरत डोंगरे, सोपान धुमाळ, मुजीब, योगेश जोशी, विलास कादे, शेख सलीम, रवी सोळंके, दीपक लावासे, बाबूलाल, कालिदास अंबिलवाडी,

पान ४ वरुन...

सचिन मोहिते, गणेश डंक तसेच केशव जिनिंग फॅक्टरीचे व्यवस्थापन मंडळ आणि परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते. शेतकऱ्यांनी विठ्ठला कोटेक्समध्ये कापूस विक्रीस आणावा विजयादशमीच्या मुहूर्तावर कापूस खरेदीचा शुभारंभ झाल्याने आगामी हंगामात कापूस खरेदीला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. परिसरातील शेतकऱ्यांनी आपला कापूस विक्रीसाठी परतूर येथील विठ्ठला कोटेक्स फॅक्टरीमध्ये आणावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर कापूस खरेदीचा प्रारंभ झाल्याने कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या आगामी हंगामाबाबतच्या अपेक्षा वाढल्या आहेत.

## भोकरदन शहरात धम्मचक्र

पत्रकार सुरेश बनकर, युवराज पगारे आणि कमलकिशोर जोगदंडे, कचरू बोर्डे, राजू पगारे, विजय पगारे, रतन बनकर, सौ संगीताबाई उजागरे, मेश्राम बाई, बिरारे बाई, पगारे बाई यांच्यासह सुजाता महिला मंडळाच्या सदस्य तसेच उपासक व उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बदनापूर नगरपंचायतीच्या नियोजनामुळे

पाडण्यासाठी योग्य नियोजन करणे महत्त्वाचे असते. बदनापूर नगरपंचायतीने केलेल्या व्यवस्थेमुळे भाविकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. यापुढेही नगरपंचायतीने अशाच प्रकारे उत्कृष्ट नियोजन व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली. नगरपंचायत प्रशासनाच्या या नियोजनाचे नागरिकांकडून अभिनंदन करण्यात येत असून, देवी विसर्जन सोहळा शांततेत पार पाडण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचेही आभार मानण्यात आले.

## जिल्हास्तरीय शालेय कराटे स्पर्धा

सचिव इब्राहिम सर आणि जिल्हा स्पर्धा संयोजक आशिष जोगदंड सर यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेदरम्यान डी.के. मास्टर कराटे, शेख चांद सर आणि कुंडलिक गरड सर यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. यावेळी खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी पालकवर्गानेही मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. जालना जिल्ह्यातील कराटे प्रशिक्षक शिवम गवळी, गणेश शिंदे, दिनेश वाघमारे, वैशाली वाघमारे, अर्षद सय्यद, जुनेद खान, अरुण काळे, सागर भाले,

पान ४ वरुन...

ओंकार घोडके आणि दीपक मगरे यांनीही सहभाग नोंदविला. स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, आत्मविश्वास, शिस्त आणि स्वसंरक्षणाची भावना वाढीस लागण्यास मदत होत आहे. विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून, आगामी स्पर्धेतही त्यांनी यश संपादन करावे, अशा शुभेच्छा उपस्थित मान्यवरांनी दिल्या.

## कुंभार पिंपळगावात

ताब्यात घेतला. पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. तेघबीरसिंग संधू यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने ही कारवाई केली. या पथकात एपीआय अविनाश गडाख, पीएसआय दिनेश बर्डे, एचसी सचिन कोकणे, एलपीसी मेघा बोराडे, पीसी नंदकिशोर जैवाळ, पीसी हरबक, पीसी नागवे, पीसी शेजुळ आणि पीसी हाळदे यांचा सहभाग होता. जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात पोलिसांकडून कारवाया सुरू असून, मटका जुगारासारख्या बेकायदेशीर प्रकारांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी अशा कारवाया अधिक तीव्र करण्याची गरज व्यक्त होत आहे

## घरफोडीचा गुन्हा उघड ; ५०

५० हजार रुपये किमतीचे साहित्य हस्तगत करण्यात आले. या प्रकरणात दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून, गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई ही कारवाई जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तेघबीरसिंग संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जे. बी. शेवाळे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस हवालदार सचिन चौधरी, सदा राठोड, धनाजी कावळे, खलील बेग तसेच पोलीस कर्मचारी मतीन शेख, इम्रान खान, दिलीप गायकवाड आणि विलास बोराडे यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

कदीम जालना पोलिसांनी गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणत चोरीचा मुद्देमाल हस्तगत केला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# शाळांमधील शैक्षणिक अभिलेखांची पुनर्तपासणी करण्याचे आदेश; कुणबी नोंदी पोर्टलवर अपलोड करण्याबाबत शिक्षण विभागाचे पाऊल

परतूर (वा.) : जालना जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यातील शाळांमधील जुन्या शैक्षणिक अभिलेखांची (जनरल रजिस्टर) फेरतपासणी करून त्यातील कुणबी नोंदी अधिकृत पोर्टलवर अपलोड करण्याबाबत शिक्षण विभागाने महत्त्वाचे निर्देश जारी केले आहेत. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना सदरील नोंदी बाबत अवगत केले असता त्यांनी आधी तक्रार दाखल करा, प्रशासन काय करते ते बघू. म्हणून मराठा सेवक भाऊसाहेब पाटील मुके यांनी विभागीय आयुक्तांकडे केलेल्या पाठपुराव्याची दखल घेत प्राथमिक शिक्षण विभागाने जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकाऱ्यांना यासंदर्भात योग्य ती पडताळणी व कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. न्या. शिंदे समितीच्या माध्यमातून मराठवाडा विभागात शालेय अभिलेखांची तपासणी करण्यात आली होती; मात्र या तपासणीत नजरचुकीने अथवा दुर्लक्षामुळे अनेक कुणबी नोंदी नोंदवह्यांमध्ये तशाच राहिल्याचा किंवा दाबून ठेवल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. परतूर तालुक्यातील जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळा, वाटूर येथे अशाच प्रकारे फेरतपासणीअंती कुणबी नोंदी आढळून आल्याचा दाखला देत, मराठवाड्यातील सर्वच शाळांमधील दस्तऐवजांची फेरतपासणी करावी, अशी मागणी भाऊसाहेब पाटील मुके यांनी विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे २४ सप्टेंबर २०२६ रोजी निवेदनाद्वारे केली होती. या निवेदनाची दखल घेऊन विभागीय आयुक्त कार्यालयाने दिलेल्या संदर्भानुसार जिल्हा परिषद जालना येथील शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी जालना, बदनापूर, भोकरदन, जाफ्राबाद, मंठा, परतूर, अंबड आणि घनसावंगी या सर्व पंचायत समित्यांच्या गटशिक्षणाधिकाऱ्यांना अधिकृत पत्र पाठवले आहे. शासन नियमांच्या अधीन राहून आपल्या स्तरावरून प्रकरणाची सखोल पडताळणी करावी, आवश्यक नियमानुसार कारवाई करून त्याचा अहवाल जिल्हा कार्यालयास सादर करावा तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत अर्जदारास अवगत करावे, असे निर्देश शिक्षणाधिकाऱ्यांनी दिले आहेत. या आदेशामुळे मराठवाड्यातील अनेक पात्र बांधवांच्या दडपलेल्या कुणबी नोंदी समोर येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

### प्रशासनावर अवलंबून न राहता स्वतः नोंदी तपासा : भाऊसाहेब पाटील मुके यांचे आवाहन



**प्रशासनाने तपासणी केली असली तरी अनेक नोंदी अजूनही दडपलेल्या असू शकतात. त्यामुळे मराठा बांधवांनी केवळ प्रशासनावर विश्वास न ठेवता स्वतः आपापल्या गावातील शाळांमध्ये जावे. आपले वडील, आजोबा किंवा पणजोबा हे जर शिकलेले असतील, तर त्यांच्या जन्माची १९६७ पूर्वीची शाळा प्रवेश घेतल्याचा (प्रवेश निर्गम) नोंद स्वतः तपासून पाहावी आणि आपल्या हक्काचा पुरावा मिळवावा. असे आवाहन मराठा सेवक भाऊसाहेब पाटील मुके यांनी केले.**

# अनुलोम संस्थेकडून वैद्यराज माध्यमिक विद्यालयाला वॉटर फिल्टर भेट



नवनाथ गव्हाणे /बदनापूर : अनुगामी लोकराज्य महाभियान (अनुलोम) संस्थेच्या वतीने अंबड येथील वैद्यराज माध्यमिक विद्यालयाला विद्यार्थ्यांसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने वॉटर फिल्टर भेट देण्यात आला. विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि स्वच्छतेचे महत्त्व लक्षात घेऊन राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून अनुलोम संस्थेने सामाजिक बांधिलकी जपली आहे. शैक्षणिक संस्थांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला. यावेळी अनुलोम संस्थेचे उपविभाग जनसेवक श्याम रक्ताटे, भाग जनसेवक अमोल दोरखे, विद्यालयाचे मुख्याध्यापक कांतीलाल राठोड, परमेश्वर वखरे, किशोर पिवळ, दत्ता राक्षे, संतोष बोंडे यांच्यासह शिक्षकवृंद उपस्थित होते.

# लिंगेवाडी पाटीजवळ भीषण अपघातात दगडवाडीच्या तरुणाचा मृत्यू



भोकरदन/प्रतिनिधी : भोकरदन-जालना मार्गावरील लिंगेवाडी पाटीजवळ सोमवारी (दि.१९) सायंकाळी झालेल्या भीषण रस्ते अपघातात दगडवाडी येथील सिद्धार्थ चिंतामण बोर्डे (वय ३२) यांचा मृत्यू झाला. भोकरदनकडून जालन्याकडे जाणाऱ्या टाटा लोडिंग वाहनाने भोकरदनकडे येत असलेल्या सिद्धार्थ यांच्या वाहनाला जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडल्याची प्राथमिक माहिती आहे. सिद्धार्थ बोर्डे हे राजूर येथील एका खासगी रुग्णालयात कामाला होते. सोमवारी (दि.१९) सायंकाळी सुमारे साडेसहा वाजेच्या सुमारास ते कामावरून घरी दगडवाडी येथे परतत असताना लिंगेवाडी पाटीजवळ हा अपघात झाला. भरधाव वाहनाची जोरदार धडक बसल्याने ते गंभीर जखमी झाले. या अपघातात त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. अपघाताची तीव्रता मोठी असल्याने घटनास्थळी नागरिकांनी गर्दी केली होती. या घटनेमुळे दगडवाडी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# अपर जिल्हादंडाधिकारी यांचे कलम ३७ (१) व (३) अन्वये आदेश जारी

जालना/प्रतिनिधी : जिल्ह्यात दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी औरंगाबाद पदवीधर मतदारसंघ निवडणुकरीता मतदान होणार आहे. तसेच दि. २५ ऑक्टोबर २०२६ रोजी कोजागरी पोर्णिमा, दि. २६ ऑक्टोबर २०२६ रोजी महर्षी वाल्मिकी जयंती इत्यादी जयंती साजरे होणार आहेत. या निवडणुक, जयंतीनिमित्त शहरात मिरवणुका व विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरीक एकत्र येतात. तसेच सद्यस्थितीत जिल्ह्यामध्ये विविध समाजाच्या आरक्षणाच्या मागण्यांच्या तसेच आरक्षण बचावाच्या अनुषंगाने तसेच दुष्काळी परिस्थिती, शेतकऱ्यांचे विविध मागण्यासाठी आंदोलने, मोर्चे, निदर्शने, रास्तारोको इत्यादी कार्यक्रम आयोजित होण्याची शक्यता नाकारतार येत नाही. त्यामुळे काही अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचया प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संपुर्ण जिल्ह्यासाठी कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश अप्पर जिल्हादंडाधिकारी यांनी जारी केले आहे.

पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) अन्वये शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यांच्या व्यतिरिक्त इतर कोणतीही व्यक्ती सार्वजनिक ठिकाणी किंवा त्या आसपास शस्त्रे, लाठ्या, सोटे, बंदुके, तलवारी , भाले, चाकु व इतर शरीरास इजा अथवा अपाय करणा-या वस्तु जवळ बाळगणार नाही. तीक्ष्ण पदार्थ अथवा स्फोटके सहज हाताळता येतील अशी घातक वस्तु जवळ बाळगणार नाही. दगड किंवा इतर उपकरणे **(पान ३ वर)**

# विजया दशमीच्या मुहूर्तावर विठ्ठला कोटेक्समध्ये खाजगी कापूस खरेदीचा शुभारंभ!



परतूर । प्रतिनिधी : विजयादशमी अर्थात दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर परतूर येथील विठ्ठला कोटेक्समध्ये सेलू येथील केशव जिनिंग प्रेसिंग फॅक्टरी, मंजीत कॉटन यांच्या खाजगी कापूस खरेदीचा शुभारंभ करण्यात आला. जिनिंग फॅक्टरीचे मालक प्रवीण शेठ जेथलिया यांच्या शुभहस्ते कापूस खरेदीचा प्रारंभ झाला. यावेळी कापसाला प्रतिक्विंटल ९ हजार ७०१ रुपये भाव देण्यात आला.

खरेदीच्या शुभारंभप्रसंगी प्रथम कापूस विक्रीसाठी आणणारे शेतकरी पप्पू यादव, जमील भाई, उद्धवराव काकडे आणि शरद सुरुंग यांचा शाल, श्रीफळ व फेटा बांधून सन्मान करण्यात आला. सणाच्या शुभमुहूर्तावर कापूस खरेदी सुरू झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले.

यावेळी बाजार समितीचे सचिव आर. बी. **(पान ३ वर)**

# निधोना रोडवरील नदीकाठी अनोळखी तरुणाचा मृतदेह आढळला; ओळख पटविण्याचे चंदनझिरा पोलिसांचे आवाहन



जालना । प्रतिनिधी : जालना शहरातील निधोना रोड परिसरात पद्मावती नगरजवळ नदीच्या कडेला अंदाजे १७ ते १८ वर्षे वयोगटातील एका अनोळखी तरुणाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या तरुणाची अद्याप ओळख पटली नसून, त्याच्या नातेवाईकांनी किंवा परिचितांनी पुढे येऊन ओळख पटविण्यासाठी चंदनझिरा पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. मृत तरुणाचे वर्णन पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत तरुणाचे वय अंदाजे १७ ते १८ वर्षे असून, त्याची उंची सुमारे पाच फूट आहे. त्याच्या अंगात निळ्या, पांढऱ्या, तपकिरी आणि काळ्या रंगाच्या रेषा असलेला पांढऱ्या रंगाचा पूर्ण बाह्यांचा शर्ट होता. त्याने काळ्या रंगाची जीन्स पॅन्ट परिधान केली होती. तसेच त्याच्या कपाळावर केशरी रंगाचा टिळा, कमरेला काळा करदोडा आणि **(पान ३ वर)**

**संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक**

पोलीस निरीक्षक बिडवे : 7020224631

पोलीस उपनिरीक्षक देशमाने : 9021458148

चंदनझिरा पोलीस ठाणे : 8459610484

# भोकरदन शहरात धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा

## अशोका बौद्ध विहार, डॉ. आंबेडकर चौक व भोगवर्धन बौद्ध विहारात विविध कार्यक्रम; सामूहिक बुद्ध वंदनेद्वारे महामानवांना अभिवादन



भोकरदन/प्रतिनिधी : भोकरदन शहरात धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात आणि मंगलमय वातावरणात साजरा करण्यात आला.

यानिमित्त शहरातील विविध बौद्ध विहारांसह डॉ. आंबेडकर चौकात ध्वजारोहण, महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण तसेच सामूहिक बुद्ध वंदनेचे आयोजन करण्यात आले होते.

शहरातील रमाई नगर येथील अशोका बौद्ध विहारात सकाळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पंचशील ध्वज व निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर तथागत गौतम बुद्ध यांच्या मूर्तीस पुष्प अर्पण करण्यात आले, तर विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सामूहिक बुद्ध वंदना घेण्यात आली.

त्यानंतर शहरातील सिल्लोड रोडवरील डॉ. आंबेडकर चौकात ध्वजारोहण करण्यात आले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

तसेच भोगवर्धन बौद्ध विहारात तथागत गौतम बुद्ध यांच्या मूर्तीस पुष्प अर्पण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी सामूहिक बुद्ध वंदना घेऊन महामानवांना अभिवादन करण्यात आले.

सदरील कार्यक्रमांना माजी नगरसेवक दीपक बोर्डे, प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते प्रदीप जोगदंडे, बाबुराव पगारे, रमेश बिरारे, शामराव दांडगे, स्मारक समितीचे सचिव सचिन पारखे, प्रा. जी. टी. खरात, प्रदीप इंगळे, भारत रगडे,भास्कर साळवे,सुनील पगारे, माजी सैनिक संजय आढावे,उत्तम पालवे, श्री दाभाडे,रवी मोरे, अशोक उजागरे, गंगाधर कांबळे,आराक मामा,रवी पगारे, **(पान ३ वर)**

# बदनापूर नगरपंचायतीच्या नियोजनामुळे देवी विसर्जन सोहळा शांततेत संपन्न!

## विसर्जनासाठी उत्कृष्ट व्यवस्था ; भाविकांकडून नगरपंचायत प्रशासनाचे कौतुक व आभार





**नवनाथ गव्हाणे/बदनापूर** : बदनापूर नगरपंचायतीच्या वतीने सार्वजनिक नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित देवी विसर्जन सोहळा शांततेत, भक्तिभावाने आणि पारंपरिक पद्धतीने उत्साहात पार पडला. देवी विसर्जनासाठी नगरपंचायतीने केलेल्या उत्कृष्ट नियोजनामुळे आणि उपलब्ध करून दिलेल्या सुविधांमुळे शहरातील तसेच तालुक्यातील भाविकांनी समाधान व्यक्त केले. बदनापूर शहरात प्रथमच गणेशमूर्ती आणि नवरात्रोत्सवातील देवीच्या मूर्ती विसर्जनासाठी करण्यात आलेल्या व्यवस्थेचे नागरिकांकडून विशेष कौतुक करण्यात आले. विसर्जन सोहळा सुरळीत पार पडावा, यासाठी नगरपंचायत प्रशासनाने केलेल्या नियोजनामुळे भाविकांना मोठा दिलासा मिळाला.

या उत्कृष्ट व्यवस्थेबद्दल नगराध्यक्षा सौ. चित्राताई संतोषभाऊ पवार, मुख्याधिकारी श्री. विशाल पाटील, उपाध्यक्ष श्री. शेख वसीम, गटनेते, स्वच्छता निरीक्षक श्री. देशपांडे तसेच सर्व सन्माननीय नगरसेवक आणि नगरपंचायत प्रशासनाचे भाविकांच्या वतीने मनः पूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. सार्वजनिक उत्सवांच्या काळात नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे आणि धार्मिक कार्यक्रम सुरळीत पार **(पान ३ वर)**

# जिल्हास्तरीय शालेय कराटे स्पर्धा उत्साहात संपन्न!

## १४ व १७ वर्षे वयोगटातील विजेत्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड; खेळाडूंनी दाखवले कौशल्य



जालना । प्रतिनिधी : जालना येथे दिनांक १९ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हास्तरीय शालेय कराटे स्पर्धा उत्साहात संपन्न झाली. या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या खेळातील कौशल्याचे प्रदर्शन केले. स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. स्पर्धेचे उद्घाटन श्रीमती वैशाली सरदार, अरुण सरदार, श्रीमती अश्विनी पडूळ, अनिल पडूळ तसेच नगरसेविका रेमाताई खरात-काळे यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

१४ वर्षे वयोगटात या खेळाडूंनी पटकावला प्रथम क्रमांक

१४ वर्षे वयोगटात कावेरी साळवे, भक्ती पंचमिरे, राजनंदनी गाडेकर, अपूर्व राऊत, आरोही काकडे, निर्वेद गरड आणि सोहम खरात यांनी प्रथम क्रमांक मिळविला. या खेळाडूंची विभागीय स्पर्धे साठी निवड झाली आहे. १७ वर्षे वयोगटातील खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड १७ वर्षे वयोगटात समर्थ तोर, पार्थ कावळे, मयूर बोर्डे, जयदेव मगरे, किरण कावळे आणि अजय देशमुख यांनी प्रथम क्रमांक पटकावून विभागीय स्पर्धेत प्रवेश मिळविला. द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या खेळाडूंचीही चमकदार कामगिरी या स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या खेळाडूंमध्ये माधवी कावळे, ईश्वरी गवळी, आर्या जाधव, श्रेया पवार, सोनाक्षी मंडळे, साहिली घोरपडे, रुद्र पाटील, साहिल शिंदे, गौरव डहिगळ आणि श्रेयस पवार यांचा समावेश आहे. कराटे असोसिएशनच्या मार्गदर्शनाखाली आयोजन जालना जिल्हा कराटे असोसिएशनचे अध्यक्ष शेख नसीर सर, **(पान ३ वर)**

# घरफोडीचा गुन्हा उघड ; ५० हजारांचा मुद्देमाल हस्तगत

## कदीम जालना पोलिसांची विशेष कामगिरी; दोन आरोपींना अटक



जालना । प्रतिनिधी : जुन्या घराचे कुलूप तोडून घरातील विविध साहित्याची चोरी केल्याप्रकरणी कदीम जालना पोलिसांनी तत्परतेने तपास करून घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणला आहे. या प्रकरणात दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून चोरीस गेलेला सुमारे ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. कदीम जालना पोलिसांच्या या कामगिरीमुळे घरफोडीच्या गुन्ह्याचा छडा लावण्यात यश आले आहे.

जुन्या घराचे कुलूप तोडून चोरी या प्रकरणातील फिर्यादी यांनी १७ ऑक्टोबर २०२६ रोजी कदीम जालना पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. फिर्यादी हे १४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सुमारे ६.३० वाजण्याच्या सुमारास जुन्या घरात सामान आणण्यासाठी गेले असता, त्यांना घरातील सर्व साहित्य व्यवस्थित असल्याचे दिसून आले होते. मात्र, १५ ऑक्टोबर रोजी दुपारी सुमारे ४.३० वाजण्याच्या सुमारास एका साक्षीदाराने फिर्यादी यांना त्यांच्या जुन्या घराचे कुलूप तोडण्यात आल्याची माहिती दिली.

त्यानंतर फिर्यादी यांनी तातडीने घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, घराचे कुलूप तोडून घरातील साहित्य चोरीस गेल्याचे निदर्शनास आले. चोरट्यांनी घरातील कपाटात ठेवलेली शिलाई मशीन, पितळी समई, सायकल, पाण्याची मोटारपंप तसेच इतर साहित्य चोरून नेले होते.

या घटनेची गंभीर दखल घेत कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ५९८/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५(अ), ३३१(३) व ३३१(४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार खलील बेग यांच्याकडे सोपविण्यात आला.

दोन तपास पथके तयार करून शोधमोहीम

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देत तपास अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच अज्ञात आरोपींचा शोध घेऊन गुन्हा उघडकीस आणण्यासाठी दोन स्वतंत्र तपास पथके तयार करण्याचे आदेश देण्यात आले.

त्यानुसार तपास पथकांनी गोपनीय बातमीदारांकडून माहिती संकलित केली. तांत्रिक विश्लेषणाच्या आधारेही तपासाची दिशा निश्चित करण्यात आली. पोलिसांनी विविध बाबींची पडताळणी करून संशयितांचा शोध सुरू ठेवला होता.

दोघांना ताब्यात घेतल्यानंतर गुन्ह्याचा उलगडा

तपासादरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी सचिन बाबुराव गायकवाड (वय २४, रा. कैकाडी मोहल्ला, जुना जालना) आणि रामेश्वर भगवान गायकवाड (वय २६, रा. जामा मशीद, मोरंडी मोहल्ला, जुना जालना) या दोघांना ताब्यात घेतले.

दोन्ही संशयितांकडे पोलिसांनी कौशल्यपूर्ण पद्धतीने चौकशी केली असता, त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर घरफोडीच्या गुन्ह्यात चोरीस गेलेले सुमारे **(पान ३ वर)**

# कुंभार पिंपळगावात मटका जुगारावर विशेष पथकाची धडक!

जालना : घनसावंगी तालुक्यातील कुंभार पिंपळगाव येथे सुरू असलेल्या मटका जुगारावर जालना पोलीस अधीक्षकांच्या विशेष पथकाने धडक कारवाई केली. या कारवाईत ६२ हजार ८६० रुपये रोख रकमेसह ३० हजार रुपये किमतीचे तीन मोबाईल फोन, असा एकूण ९२ हजार ८६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे परिसरातील अवैध जुगाराच्या व्यवसायाविरुद्ध पोलिसांनी कठोर पाऊल उचलल्याचे दिसून आले. घनसावंगी पोलीस ठाण्याच्या हद्दीत कुंभार पिंपळगाव येथे ही कारवाई करण्यात आली. यामध्ये रहीम इसाक पठाण (रा. राजेटाकळी, ता. घनसावंगी), भगवत अण्णासाहेब खरात (रा. वडी लासुरा, ता. अंबड), कैलास जगन्नाथ अर्दड (रा. राजेटाकळी, ता. घनसावंगी) आणि गणेश गुलाब राठोड (रा. बंगलेवाडी, ता. घनसावंगी) यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली. तसेच मटका व्यवसायाशी संबंधित असल्याचे नमूद करण्यात आलेल्या आकाश शिंदे (रा. कुंभार पिंपळगाव) याचे नावही समोर आले आहे.

रोख रकमेसह मोबाईल जप्त

या कारवाईदरम्यान पोलिसांनी ६२ हजार ८६० रुपये रोख आणि प्रत्येकी मिळून ३० हजार रुपये किमतीचे तीन मोबाईल फोन जप्त केले. एकूण ९२ हजार ८६० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी **(पान ३ वर)**